विषय निबंध
स. नं. 982

# [illegible] च्य—
# [illegible] ची तात्कालिक आवश्यकता !

( श्री. सी. एफ्. अँड्र्यूज यांचे ४ लेख. )

१९२३.

REFBK-0002222

अनुवादक:—

दु. वा. केळकर

उ. स. ‘महाराष्ट्र’ (नागपूर).

किंमत ०४ आणे.

REFBK-0002222

# खुलासा.

प्रस्तुत चार निबंध प्रसिद्ध इंग्रज तत्त्ववेत्ते श्री. सी. एफ्. ऍंड्र्यूज यांच्या तेजस्वी लेखणींतून बाहेर पडले आहेत. ते असहकारितेच्या ऐन सुरवातीस लिहिले गेल्याकारणानें असहकारितेच्या तपशिलाच्या बाबींसंबंधीं त्यांत जे विचार आले आहेत, ते सर्वांस—रूपांतरकर्त्यासहि सर्वस्वी पसंत पडणें शक्य नाहीं. किंबहुना खुद्द लेखकानेंहि गेल्या दोन अडीच वर्षांच्या अनुभवानंतर हे लेख पुनः वाचले, तर त्यासहि त्यांत पुष्कळ ठिकाणीं फेरफार करण्याची अनावर इच्छा होईल. परंतु, हा मुद्दा गौण आहे. श्री. अँड्र्यूजसाहेबांसारख्या एका निःस्पृह गोऱ्या लेखकानें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासंबंधीं कोणाचीहि भीडमुर्वत न धरतां, इतक्या कळकळीचे उद्गार काढावे हेंच या लेखांचें वैशिष्ट्य आहे. आणि त्यासाठींच हें रूपांतर प्रसिद्ध होत आहे.

रूपांतरकर्ता.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. २२२२

मराठी ... ग्रंथ ... क्र. २३२२ ... नि. ...

# हिंदुस्थानचें स्वातंत्र्य !

## त्याची तात्कालिक आवश्यकता !

सध्यां हातघाईचे दिवस असून देशभक्तांच्या आत्मबलि-दानाच्या व हालअपेष्टांच्या द्वारें वस्तुस्थितीस कसें तोंड द्यावें; आणि माणुसकी व स्वाभिमान नेस्तनाबूद करणाऱ्या गोष्टींशीं आपला संबंध कसा ठेवूं नये, याबद्दलचे धडे आम्हांला दिवसेंदिवस अधिकाधिक मिळत आहेत.

हल्लीं नुसत्या गोडगोड गोष्टी सांगितल्यानें आमचें समाधान होत नाहीं. हल्लीं आम्ही सत्याचे भोक्ते झालों आहोंत. सध्यां जी प्रचंड जागृति व निर्भीडपणें सत्याविष्करण करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे, ती लक्षांत घेऊन प्रकृति अस्वस्थ आहे तरी-सुद्धां मी ही लेखमाला लिहीत आहे. मी परिस्थितीच्या अगदीं मुळाशीं जाऊन पुढील सवाल विचारणार आहे. आज एकदम इतक्या उत्सुकतेनें, घाईनें व धडाडीनें स्वातंत्र्याची धडपड आपण कां करीत आहोंत? इतर गोष्टी मागें राहिल्या तरी चालतील; परंतु, ही स्वातं-त्र्याची लढाई आम्हांला घटकाभरसुद्धां बंद ठेवितां येणें शक्य नाहीं, असें आजच आम्हांस कां वाटूं लागलें आहे बरें?

या प्रश्नांचीं अनेक उत्तरें देतां येतील. परंतु, मी मात्र एकच देणार आहें. तें आज कित्येक वर्षें माझ्या डोक्यांत घिरट्या घालीत असून, त्यामुळें हिंदुस्थानसंबंधींच्या माझ्या विचारांस एक

प्रकारचें निश्चित वळण लागलें आहे. हें उत्तर 'मूले कुठार:' या न्यायानें सबंध प्रश्नाच्या मुळाशींच जाऊन भिडत आहे.

'इग्लंडचा राज्यविस्तार' (The Expansion of England) नांवाचें एक पुस्तक आहे. त्याच्या कर्त्याचें नांव जॉन सीली. शक्य असल्यास प्रत्येक हिंदी विद्यार्थ्यानें तें वाचावें. प्रथमत: 'इंग्लंडचा राज्यविस्तार' या नांवाचाच विचार करा. त्यांत इंग्लंडचा विस्तार कसकसा होत गेला, तें वर्णिलें आहे; आणि मौज ही कीं, त्यांतला बहुतेक अर्धा मजकूर हिंदुस्थानसंबंधींचा आहे. या एकाच गोष्टी-वरून आपणांस त्यासंबंधीं विचार करणें जरूर आहे. सर जॉन सीली म्हणतो कीं, अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत इग्लंडच्या राज्यविस्ताराचें हिंदुस्थान हें एक साधन गणलें जात असे. प्रति-कारशून्य व 'ताटाखालील मांजर' झालेल्या हिंदुस्थानच्या जोरावरच इग्लंड आपल्या साम्राज्याचे हातपाय सबंध जगभर पसरूं शकलें. केवढा दैवदुर्विलास हा! सात हजार मैलांवर उत्तर समुद्रांत लुकलुकणाऱ्या एका टीचभर बेटाच्या साम्राज्याचे आम्ही गुलाम असावें, ही गोष्ट आम्हां तीस कोट लोकांस संतापजनक वाटूं नये काय?

सर जॉन सीली यांच्या पुस्तकाची भाषा अगदीं निर्भीड व स्पष्ट आहे. तसें नसतें तर मी त्याकडे लक्षच दिलें नसतें; व हिंदी लोकांनीं तें वाचावें, असेंही म्हटलें नसतें. आतां त्या पुस्तकांतील एक महत्वाचा उतारा मी पुढें देतो. लक्षांत असूं द्या कीं, १८८२ सालीं म्हणजे जवळजवळ चाळीस वर्षांपूर्वीं ग्रंथकर्त्यानें हें पुस्तक लिहिलें आहे. विसाव्या शतकांत उल्कापात घडवून आणणाऱ्या गोष्टी

पाहण्यास तो जिवंत नव्हता, ही गोष्ट कोणीही विसरूं नये. तो म्हणतो:—

"हिंदी राष्ट्रीयत्वाची बीजरूप वाढ कोठेंकोठें होत असलेली आपणांस दिसत असली, तरी एकंदरींत सध्यां हिंदी राष्ट्रीयत्वाचा अभाव आहे, ही गोष्ट स्पष्टपणें दृग्गोचर होत आहे. आणि म्हणून, इंग्रज जातीच्या अत्युच्च वरिष्ठत्वामुळें नव्हे, तर हिंदी राष्ट्रीयत्वाच्या या अभावामुळेंच हिंदुस्थानांत आपलें साम्राज्य अभंग टिकून राहिलें आहे. इटालींत जशी राष्ट्रीय चळवळ सुरू झाली, तशाच प्रकारची चळवळ जर हिंदुस्थानांत सुरू होईल, तर आस्ट्रियानें इटालींत प्रतिकार केला तेवढासुद्धां इंग्रजांस हिंदुस्थानांत करितां येणार नाहीं. आणि तसें झाल्यास येथील इंग्रजी सत्तेचा तात्काळ लोपच होईल. इंग्लंड हें कांहीं लष्करी राष्ट्र नव्हे. अशा परिस्थितींत २५ कोट लोकांच्या बंडाचा चुराडा ते कोणत्या साधनांनीं करणार? मागें आम्हीं हिंदी लोकांस जिंकिलें तसेंच आतांही जिंकूं असें आपणांस वाटतें काय? परंतु, आपण मुळीं त्यांना जिंकिलेंच नाहीं, असें मी दुसरीकडे सिद्ध केलें आहे. ज्या सैन्यानें आपणांसाठीं लढून आपणांस जय संपादन करून दिला, त्यापैकीं चारपंचमांश लोक 'नेटिव्ह' लोकच होते, असें मी अन्यत्र दाखविलें आहे. हिंदुस्थानांत राष्ट्रीत्वाच्या वृत्तीचा अभाव होता, म्हणूनच हिंदी लोकांचें एवढें मोठें सैन्य हिंदुस्थानांतच हिंदी लोकांविरुद्ध लढण्यास आपणांस मिळूं शकलें!"

येथपर्यंत इंग्लंडनें हिंदुस्थानला जिंकिलें नसून केवळ हिंदी लोकांच्या सहकार्यामुळेंच इंग्रजांचा हिंदुस्थानावर अंमल चालू आहे,

ही गोष्ट सर जॉन सीली यांनीं स्पष्टपणें वाचकांपुढें मांडिली आहे. त्यानंतर तो काय म्हणतो तें सर्वांनीं नीट काळजीपूर्वक पहावें. तो म्हणतो:—

" हिंदुस्थानांत पुसटपुसट कां होईना, पण थोडीतरी राष्ट्रीयत्वाची भावना पैदा झाली; व तिजमुळें परदेशी राज्यकर्त्यांना देशांतून हांकलून देण्याची इच्छा उत्पन्न न झाली; तरी फक्त परकीयांस त्यांच्या राज्यकारभारांत मदत करणें लज्जास्पद आहे, एवढीच भावना लोकांचे मनांत पैदा होईल, तर त्या दिवसापासून आपलें साम्राज्य लयासच गेलें असें समजा! कारण ज्या सैन्यभाराच्या जोरावर आपलें साम्राज्य चाललें आहे, त्या सैन्यापैकीं जवळजवळ दोनतृतीयांश सैन्य हिंदी सैनिकांनींच भरलेलें आहे. ऑस्ट्रियन सरकारनें ऑस्ट्रियन सैनिकांऐवजीं इटालियन सैनिकांवरच साम्राज्यरक्षणाचा भार ठेविला असता, तर ऑस्ट्रियन सरकारला हांकलून देणें इटालियन देशभक्तांस किती सोपें गेलें असतें, याची कल्पना करा. समजा, हिंदी सैनिकांनीं बंड न पुकारतां फक्त इतःपर सरकारी सैन्यांत भरती होण्याचें नाकारिलें तर काय परिणाम होईल बरें? लगेच हिंदुस्थानाला आपल्या साम्राज्याच्या मगरमिठींत पकडून धरणें अशक्य असल्याचें आपणांस दिसून येईल! कारण विशेषसे परिश्रम न घेतां हिंदी साम्राज्य कबजांत ठेविलें पाहिजे, असा आपला करार आहे. इंग्लिशांनीं विशेषसे परिश्रम न घेतां तें संपादन केलें, त्याचप्रमाणें त्यांनीं तें राखिलें पाहिजे. आमच्या मिळकतीच्या संरक्षणार्थ सैन्यावर सैनें उभारून लाखों रुपये उधळण्याची आमची तयारी नाहीं, आपण हिंदुस्थान हें जित राष्ट्र म्हणतों खरें; परंतु

ज्या घटकेला हिंदुस्थान आपलें खरें स्वरूप प्रगट करील त्या घटकेला, 'आतां हिंदुस्थान हातांत ठेवणें अशक्य आहे' ही गोष्ट कबूल करणें आपल्याला भाग पडेल!"

वरील वाक्यांवरून काय समजावयाचें तें वाचकांनींच समजावें. मी त्यासंबंधीं कांहींही लिहूं इच्छित नाहीं. परंतु, त्यावरून प्रस्तुत चळवळीच्या मूलभूत तत्त्वांची जाणीव आपणांस होत नाहीं काय? महात्मा गांधी सबंध देशांत प्रांतोप्रांतीं फिरले, तेव्हां आपणांस काय दिसून आलें? ज्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेवर सर जॉन सीली एवढा जोर देतो, त्या भावनेचाच ठिकठिकाणीं प्रादुर्भाव झालेला आपणांस दिसून आला नाहीं काय? सर जॉन सीली म्हणतो त्याप्रमाणें 'परकीयांचे राज्यकारभारांत त्यांस मदत करणें लज्जास्पद आहे' अशाच प्रकारच्या भावनेचा सर्वत्र प्रादुर्भाव झालेला आपणांस दिसून आला नाहीं काय? आम्हांला इंग्रज लोक 'जित राष्ट्र' समजतात, या गोष्टीची जाणीव सध्यांच्या दैन्यावस्थेंतही आम्हांस झालेली नाहीं काय? वरील सर्व गोष्टी खचित घडून आल्या आहेत. मग आतां, गुलामगिरीचा अंतकाळ समीप आला; या घटकेला स्वराज्यदेवता आमचें दार ठोंठावीत असेल, परंतु आम्हीच तें घट्ट बंद करून तिला आंत येऊं देत नसूं—अशी कल्पना करणें अयोग्य ठरेल काय?

सरतेशेवटीं, पूर्वीच्याइतकाच महत्त्वाचा दुसरा एक सीलीच्या तोंडचा उतारा मी पुढें देतों. जनता नुसती कष्टप्रद अवस्थेच्या खोल दरींत पडली असतां बंडें उत्पन्न होत नाहींत; तर जेव्हां तिचे

डोळे उघडून तिला आशेचे किरण दिसूं लागतील, तेव्हांच बंडें उपस्थित होत असतात—या ऐतिहासिक तत्त्वाचा उहापोह करतांना सर जॉन सीली म्हणतो:—

"परतु जर कां हिंदुस्थानांत एकराष्ट्रीयत्वाची भावना पैदा झाली—आणि ही भावना पैदा होणारीं कृत्यें पूर्वीच्या सरकारांपेक्षां हल्लींच्या सरकारकडूनच अधिक होत आहेत—तर मात्र अमला निर्वाणीचा उपाय योजण्याचें हिंदुस्थानला कारण उरणार नाहीं. कारण तशा परिस्थितींत एकराष्ट्रीयत्वाचा पगडा हिंदी सैनिकांच्या मनावर पक्का बसेल ! आणि हिंदी सैनिकांवरच तर आपली सर्व मदार ! १८५७ सालचें बंड मोठें होतें, तरीसुद्धां आपण तें मोडूं शकलों. कारण जनतेनें त्या बंडाबद्दल इतकी प्रत्यक्ष सहानुभूती दाखविली नाहीं; व आपल्या बाजूनें लढण्यास आपणांस हिंदी सैनिक मिळूं शकले ! परंतु, ज्या घटकेला सैन्यांत बंड होणार, अशीं नुसतीं लक्षणें दिसूं लागतील—आणि हें नुसतें बंडच होणार नाहीं तर त्याबरोबर सर्वत्र एकराष्ट्रीयत्वाची भावना प्रगट होईल—त्या घटकेला आपल्या सबंध आशेचे डोलारे धुळीस मिळाले, असेंच समजा. वास्तविक पाहतां अशा परिस्थितींत आपल्या साम्राज्यसंरक्षणाच्या सर्व आशेचा अंतच व्हावयास पाहिजे. कारण आपण हिंदुस्थानचे खरे जेते नाहीं. आणि जेते या दृष्टीनें आपण त्यांच्यावर राज्य करूं शकत नाहीं; आपण तसें करण्याचें धाडस करूं तर त्यांत आपणांस यश मिळेल की नाहीं याचा आपणांस संशयच नको. कारण पहिल्या भडाक्यालाच आपत्तिक दडपणाखालीं ठेचले जाऊन आपण नाश पावूं !"

हे दोन अत्यंत महत्त्वपूर्ण असे उतारे मी वर दिले आहेत. ते प्रत्येक विद्यार्थ्यानें काळजीपूर्वक वाचावे. त्यांपासून एक गोष्ट दृष्टोत्पत्तीस येईल, आणि ती ही कीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यमंदिराची उभारणी सशस्त्र युद्धाच्या अगर अत्याचाराच्या पायावर न होतां, तीस कोट लोकांचे अंत:करणांत उत्पन्न होणाऱ्या एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेवरच झाली पाहिजे.

वरील गोष्ट लक्षांत घेतां आपणांस गांधीजींसारखा महात्मा सहकारी मित्र मिळाला आहे, ही ईश्वरी कृपाच नव्हे काय ? दुसऱ्या लेखांत, सर जॉन सीलीच्या पुस्तकांतील उताऱ्यांवरून हिंदुस्थानला या घटकेला स्वातंत्र्याची किती आवश्यकता आहे, हें सिद्ध करण्याचा मी प्रयत्न करणार आहें.

( २ )

या लेखांत सर जॉन सीली यांनीं पुढें मांडलेल्या हिंदी स्वातंत्र्यासंबंधींच्या दोन ऐतिहासिक सत्यांचा मी विचार करणार आहें. या सत्यांचा मी जों जों ज्यास्त विचार करूं लागलों तों तों तीं माझ्या हृदयांत शल्याप्रमाणें अधिकाधिक 'बोंचूं लागलीं. आणि ह्मणूनच गुलामगिरीचीं पाळेंमुळें कितीं खोलवर जाऊन पोंचतात; व त्यांचा समूळ उच्छेद करणें किती कठीण असतें, याचा या ठिकाणीं विचार करणें मला भाग पडलें आहें.

पहिलें ऐतिहासिक सत्य, सर जॉन सीली याच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे खालील होय. तें असें :—

" दीर्घकाळपर्यंत परकीय सत्तेचें जूं मानेवर असणें हें राष्ट्राच्या ऱ्हासाचें सर्वांत बलवत्तर कारण होय !"

यांतील प्रत्येक शब्द नीट लक्षांत ठेवा. नुसती गुलामगिरी नव्हे, तर ' दीर्घकाळपर्यंत ' चालत असलेली गुलामगिरी हेंच राष्ट्रीय ऱ्हासाचें एक बलवत्तर कारण आहे. आज १६० वर्षें हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्याच्या दडपणाखालीं अधिकाधिक दडपलें जात आहे ! १६० वर्षें हा खचित लहानसान काळ नव्हे. यापेक्षां दीर्घकाळ तो आणखी केवढा पाहिजे ? सीलीचें म्हणणें खरें असेल, तर जसजसें एकेक वर्ष खलास होत आहे, तसतसा इंग्लंडच्या अंमलाखालीं हिंदुस्थानचा राष्ट्रीय ऱ्हास अधिकाधिक जोरानें होत आहे, ही गोष्ट सिद्ध होते. तर मग आणखी किती काळपर्यंत हिंदुस्थान परकीयांच्या अंमलाखालीं राहणार ? एकेक वर्ष संपुष्टांत

येतें, तों तों हिंदुस्थानचा पाय राष्ट्रनाशाच्या चिखलांत अधिकाधिक खोल रुतत नाहीं काय ?

- रुतत असेल, तर आणखी एका भयंकर ऐतिहासिक सत्यास तोंड देणें आपणांस भाग पडणार आहे. इतःपर ब्रिटिश साम्राज्यांत राहून त्यांच्या ओंजळीनें पाणी पीत राहाणें हें राष्ट्रीय ऱ्हासाचें दुःख अधिकाधिक तीव्र करण्यासारखें आहे, हेंच तें सत्य होय. त्यांतून सुरक्षित बाहेर पडावयाचें असेल तर, पारतंत्र्याच्या बेड्या तटातट तोडून टाकण्याशिवाय आपणांस गत्यंतर नाहीं.

सर जॉन सीली यानें सांगितलेल्या दुसऱ्या ऐतिहासिक सत्यामुळें ' इकडे आड तिकडे विहीर ' अशी हिंदी लोकांची स्थिति होणार आहे. त्यांतून आपली सुटका होणें तर अगदींच अशक्य ! ब्रिटिश सरकार हिंदुस्थानांतून चालतें झालें तर काय होईल ? असा अखेरचा प्रश्न त्यानें विचारला असून, त्याचें उत्तर त्यानें पुढीलप्रमाणें दिलें आहे. तो म्हणतो :—

" हिंदुस्थानसारख्या परतंत्र देशांतून ब्रिटिश सरकारनें पाय काढणें; ज्या देशाला आपण ब्रिटिश सरकारव्यतिरिक्त दुसऱ्या कोणावरही अवलंबून राहणें अशक्य केलें आहे त्या देशांतून ब्रिटिशांनीं पाय काढणें. यापेक्षां अधिक मोठा गुन्हा आमचे हातून दुसरा कोणताही होऊं शकणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यामुळें मोठमोठीं अरिष्टेंही कोसळण्याचा संभव आहे."

या वाक्यावरून फक्त एकच अर्थ निष्पन्न होतो. आणि तो हा कीं, हिंदुस्थानला सध्यांची कोंडी फोडून बाहेर पडतां येणें अशक्य

आहे. हिंदुस्थान कधींतरी स्वसंरक्षणसमर्थ बनेल, असें कोणत्याही इतिहासकारास वाटत नाहीं. तुलनात्मक दृष्टीनें पाहतां हिंदुस्थानां-तील ब्रिटिशांचें राज्य हें ब्रिटनमधील जुन्या काळच्या रोमन राज्या-प्रमाणेंच आहे, असें मानण्यांत येतें. रोमन लोकांनीं ज्यावेळीं ब्रिटनचा किनारा सोडला; परकी सत्तेपुढें हतबल होऊन स्वसंरक्षण करण्याइतकें त्राणदेखील रोमन लोकांचे अंगीं न उरल्यामुळें त्यांचीं जहाजें जेव्हां ब्रिटिश बंदरांतून कायमचीं निघालीं; तेव्हां ब्रिटनमधील पतित लोक तीं दिसेनाशीं होईपर्यंत त्यांकडे आशाळभूतपणानें टक लावून पाहत होते, असें म्हणतात. तद्वतच हिंदी लोकांचीही स्वराज्यशक्ति व स्वसंरक्षणशक्ति हीं इतकीं धुळीस मिळालीं आहेत कीं, आतां ब्रिटिशांनीं स्वराज्याची व स्वसंरक्षणाची जबाबदारी त्यांचे डोक्यावर टाकून येथून चालतें होणें हा मोठाच गुन्हा होईल ! असें सर जॉन सीली म्हणतो. सबंध पुस्तकांत ह्याच मुद्याचें आविष्करण त्यानें पुन:पुन्हा केलें आहे. हा मुद्दा ऐतिहासिक दृष्ट्या कमी महत्त्वाचा आहे, असें आपणांस केव्हांही म्हणतां येणार नाहीं.

सर जॉन सीली म्हणतो:—“ इतर देशांची गोष्ट बाजूला राहो; पण निदान हिंदुस्थानचे अंगीं तरी, स्वत:चे पायावर उभें राहून एकादी मजबूत राज्यपद्धति प्रस्थापित करण्याचें त्राण उरलेलें नाहीं ! आणि स्वतंत्र सरकार स्थापण्याचें जें कांहीं त्राण त्याचे अंगीं निसर्गत: शिल्लक होतें, तें सर्व ब्रिटिश राज्यानें नेस्तनाबूद करून टाकलें असलें पाहिजे ! ”

केवढा मोठा कबुलीजबाब हा ! आणि तोही एका इंग्रज इतिहासकाराच्या तोंडचा ! हिंदुस्थानची किती नादान स्थिति ही !

यावच्चंद्रदिवाकरौ पारतंत्र्य व गुलामगिरीच हिंदुस्थानच्या नशिबीं लिहिली आहे, एवढेंच यावरून सिद्ध होते नाहीं काय?

सर जॉन सीली यांच्या यथार्थ उक्तीमुळें 'पुढें काय?' हा प्रश्न साहजिकच आपणांपुढें दत्त म्हणून उभा राहातो. परकीय ब्रिटिश सरकारच्या दडपणाखालीं आमचें परावलंबन व गुलामगिरी अशीच चालावयाची असेल, तर हिंदी राष्ट्राचा ऱ्हास दिवसेंदिवस अधिकाधिक होत जाणार, हें निश्चित आहे. बरें, एवढ्यानें तरी भागेल असें म्हणावें तर तसेंही नाही. राष्ट्रीय ऱ्हासाबरोबर ब्रिटिश साम्राज्याच्या कोंडींतून फुटून बाहेर पडणें हें देखील आम्हांस अधिकाधिक कठीण होत चाललें आहे. कारण हरघडी मदतीसाठीं व स्वसंरक्षणासाठीं इंग्लंडच्या तोंडाकडे बघण्याची जरुरी हिंदुस्थानला अधिकाधिक वाटूं लागली आहे.

येथेंच प्रत्येकाची बुद्धि किंकर्तव्यतामूढ होऊन बसते. काय करावें तेंच कळत नाहीं. कोणताही मार्ग पत्करिला तरी संकट-परंपरेच्या चक्रांतून आपली सुटका होत नाहीं. कित्येक वर्षें तरी या प्रश्नाचा मी अहोरात्र विचार केला. परंतु कांहीं केल्या त्याचें उत्तर मला सुचेना!

आतां आतां मात्र, या भयंकर चक्रांतून बाहेर पडण्याचा एक मार्ग मला मोकळा दिसूं लागला आहे. तो हा कीं, फारसा कालावधि लोटला नाहीं तोंच एकाददुसऱ्या प्रांतांत नव्हे, तर सबंध देशभर स्वातंत्र्यस्फूर्तीचे निखारे प्रज्वलित करणारा असा एकादा राष्ट्रपुरुष ईश्वरीकृपेनें आम्हांला लाधला, तर या चक्रांतून बाहेर पड-

ण्याची कांहींतरी आशा आहे, असें मला वाटतें. सध्यांच्या माणसांतूनच असा एकादा स्फूर्तिजनक राष्ट्रपुरुष हिंदुस्थानांत तयार होईल, तर अजूनही गाडी रुळावर येण्याची आशा आहे.

आणि बरोबर हाच प्रकार आज आपणांस दृश्य स्वरूपांत दिसत आहे. आजचा प्रसंग हिंदुस्थानच्या इतिहासांत अत्यंत हातघाईचा असा आहे. आज गुलामगिरीचा व परावलंबनाचा सर्वांस तिटकारा आला असून तीं सर्वांस असह्य झालीं आहेत. अशा प्रसंगीं, ' बाबावाक्यं प्रमाणम् ' या न्यायानें पूर्वापार चालत आलेल्या रूढींना गचांडी देऊन ' स्वतंत्र व्हा ! गुलामगिरीचीं बंधनें तोडा !' या मंत्राचा सारखा उच्चार करणारा एक पुरुष आमच्यांत उत्पन्न झाला आहे.

महात्मा गांधींसारख्या ज्वालाग्रहीनें कडाडून पेट घेतल्याकारणानें प्रथमतः पुष्कळसा विनाश होईल; आणि विधायक कामगिरी गोचर होण्यापुर्वी पुष्कळसा विघात दृष्टीस पडेल, ही गोष्ट खरी आहे. परंतु, त्यांत कांहीं विशेष नाहीं. देशांत जें नवीन वातावरण उत्पन्न झालें, नवीन शक्ति संचार करूं लागली, निराशेच्या दगडी पोटांतून राष्ट्रजीवनाचा जो जिवंत झरा वाहूं लागला, त्याचा प्रत्येकानें विचार केला पाहिजे. अखेरीस ही क्रांति विधायकच ठरेल, विघातक होणार नाहीं हें खास. सबंध जनतेची निद्रावशता नष्ट होऊन ती खडखडीत जागी होणार व या शक्तीची वाढच होत जाणार !

येथपर्यंत वर्णिलेल्या परिस्थितीवरून मला जरी आशेचे व उत्साहाचे किरण दृग्गोचर होत असले; तरीसुद्धां पुष्कळशा विचारी

हिंदी देशभक्तांचा 'आस्ते कदम' प्रगतीचा मोह अद्यापि सुटत नाहीं, या गोष्टीची जाणीव मला आहे. कांहीं वर्षांपूर्वी मलाही हें 'आस्ते कदम' प्रगतीचें जुनाट धोरण बरेंचसें पसंत होतें.

परंतु, अद्यापहि त्यास चिकटून बसणाऱ्या लोकांस माझा असा सवाल आहे कीं, ब्रिटिश साम्राज्यसत्ता अशीच कायम राहिल्यास दिवसेंदिवस शुक्लेंदुवत् वाढत जाणाऱ्या परावलंबनाचा व गुलामगिरीचा तुम्हीं कसा काय बंदोबस्त करणार? सीलीच्या ऐतिहासिक सत्यांस तुम्हीं कसेंकाय तोंड देणार? सीली यांच्या लेखणींतून बाहेर पडलेल्या उपरिनिर्दिष्ट भयंकर वाक्यांची तुम्ही कशी काय वासलात लावणार? सुधारणांच्या कायद्यामुळें थोडीशी जबाबदारी आपणांस मिळाली आहे असें गृहीत धरून चाललें, तरीसुद्धां इंग्लंडच्या ओंजळीनें पाणी पिण्याची पारतंत्र्याची भावना त्यांत अखेरपर्यंत शिल्लक उरतेच कीं नाहीं? स्पष्ट रीतीनें स्वातंत्र्यपक्षाचा पुरस्कार करण्याखेरीज गुलामगिरीच्या गर्तेंतून बाहेर पडण्याचा एकतरी मार्ग आपणांपुढें शिल्लक आहे काय? राज्यकर्त्यांची लहर लागेल तेव्हां, मोठ्या नाखुषीनें व भीतभीत, आमच्या पदरांत फेंकल्या जाणाऱ्या होमरूलच्या तुकड्यांनीं नूतन अंतःस्थ शक्ति निर्माण होईल, काय? खुद्द ब्रिटिश इतिहासकारास देखील अशी शक्ति निर्माण होईल असें वाटणार नाहीं.

जुन्या मतास चिकटून बसणाऱ्या लोकांस मी हे अंतःस्थ सवाल टाकले आहेत. निदान माझ्या मनांत तरी या मताच्या यशस्वितेविषयीं इतकी जबरदस्त शंका आहे कीं, आतां मी आपल्या

मताचा कांटा आनंदानें दुसऱ्या बाजूकडे झुकविला आहे. महात्माजीं-सारखी ज्वालाग्रही विभूति आम्हांस लाधली आहे. त्यांचें नैतिकबल पहिल्या प्रतीचें आहे. आमच्या हृदयांत छपून बसलेल्या स्वातंत्र्याच्या जिवंत झऱ्याची जाणीव त्यांनीं आम्हांस करून दिली आहे. दुसऱ्यांच्या तोंडाकडे पाहून नव्हे, तर स्वतःच्या पायावर उभें राहण्याचा स्वावलंबनाचा धडा त्यांनीं आम्हांस शिकविला आहे. त्यांचा उपदेश मला सर्वस्वी पटतो. व त्यांनीं उपदेशिलेल्या मार्गानेंच गेलें असतां, अखेरीस आपणांस स्वातंत्र्यप्राप्ति होईल, अशी मला आशा वाटते.

( ३ )

मागील लेखांत दिग्दर्शित केलेल्या मुद्याचाच या लेखांत जरा निराळ्या दृष्टीनें मी विचार करणार आहें. हा विषयच मुळीं राष्ट्राच्या सोक्षमोक्षासंबंधीं असल्यामुळें पुनरावृत्ति करण्यास मला बिलकुल दिक्कत वाटत नाहीं.

सर जॉन सीली यानें पुढील सत्य अत्यंत स्पष्ट व सरळ शद्वांत आपणांपुढें मांडलें आहें. तो म्हणतो :—" परकी राज्यसत्तेच्या धुरेला दीर्घकाळपर्यंत जखडून राहणें हें राष्ट्रीय ऱ्हासाचें एक बलवत्तर कारण आहे."

हें वाक्य व त्यावरून दिग्दर्शित होणारें आपल्या दैन्यावस्थेचें चित्र प्रत्येक हिंदी गृहस्थानें आपल्या हृदयांत कोरून ठेवावें. हें अपमानाचें शल्य आपल्या हृदयांत खोलवर टोंचेपर्यंत चालू स्थिति सुधारण्याची आशा नाहीं. माझे मित्र बाबू रामानंद चतर्जी यांनीं हीच विचारसरणी उत्कृष्ठ रीतीनें ग्रथित केली आहे. ते म्हणतात:—

" अखिल राष्ट्राचा अपमान झाला. अखिल राष्ट्रीय अन्याय झाला, अखिल राष्ट्र दुर्बलतेस जाऊन पोंचलें. किंवा अखिल राष्ट्राला चीड आली—तरच अखिल राष्ट्रीय चळवळ निर्माण होऊं शकते." असें कोणतें अखिल राष्ट्रीय व अपमानास्पद कारण आहे कीं ज्यामुळें स्त्रीपुरुष, सुशिक्षित-अशिक्षित, श्रीमंतगरीब, राजारंक, हिंदु-मुसलमान, ख्रिस्ती, बुद्ध, जैन, शीख, ज्यू, पारशी, भांडवलवाले-मजूर, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्पृश्यास्पृश्य, अस्सल-कमअस्सल इ. सर्व जाती व माणसें एके ठिकाणीं एका निशाणाखालीं येऊं शकतील किंवा आलीं

पाहिजेत ? परकी अंमल व परकीयांनीं चालविलेली उकळाउकळ हेंच तें एक कारण होय ! आमचीं कितीही गाऱ्हाणीं असोत, व आमच्यावर कितीही अन्याय झालेले असोत, परकी अंमलाच्या वरवंट्याखालीं आम्हीं सर्वजण सारखे भरडले जात आहोंत; आणि हें पारतंत्र्यच आम्हां सर्वांस सारखें मानहानिकारक आहे; व तसें तें आम्हांस वाटलेंहि पाहिजे.

युरोपच्या उत्तरेकडून सात हजार मैलांवरून आलेल्या मूठभर राज्यसत्ताधाऱ्यांच्या अंमलाखालीं, प्लासीच्या लढाईपासून आजपर्यंत म्हणजे सुमारें १६० वर्षें सारखें खितपत पडणें, हा खचित दीर्घकाळ होय. सीलीचें ऐतिहासिक सत्य खरें असेल, तर इतके दिवस गुलामगिरींत खितपत पडल्यानें सबंध राष्ट्राचा ऱ्हास झाल्याशिवाय राहणार नाहीं. यासाठींच हिंदुस्थानला तात्काळ स्वातंत्र्य मिळालें पाहिजे. आणि यासाठींच इतर महत्त्वाच्या गोष्टी चालू असतांहि तें लांबणीवर टाकतां येत नाहीं. आतां आणखी आमचा किती राष्ट्रीय ऱ्हास व्हावयाचा आहे, तें ईश्वरासच ठाऊक ! इतःपर तो अधिक न होऊं देणें हें आपलें कर्तव्य आहे. राष्ट्रीय ऱ्हासाची ही कीड राष्ट्राचें हृदय सारखें पोखरीत असतांना, आपणांस स्वस्थ चैनींत बसून चालणार नाहीं.

'इंग्लंडनें हिंदुस्थानशीं असलेला संबंध सोडला, तर तात्काळ हिंदुस्थानचा घात होईल, इतकी हिंदुस्थानची स्थिति आज हलाखीची व केविलवाणी झाली आहे—इ.' उद्गार सर जॉन सीली यांनीं ज्या प्यारिग्राफांत काढिले आहेत, त्याच प्यारिग्राफांत आणखी एक

दुसरें भयंकर वाक्य त्यांनीं लिहिलें आहे. तें वाचून तरी निदान प्रत्येक देशप्रेमी हिंदवासीयानें पुढील कार्यास लागलें पाहिजे.

सर जॉन सीली म्हणतो:—" ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानांतून पाय काढणें, हा अत्यंत मोठा व अक्षम्य गुन्हा होय!" कां? तर तो पुढें म्हणतो:—" आम्हीं ब्रिटिशांनीं हिंदुस्थानला स्वतःच्याच काय, पण आम्हांखेरीज इतरांच्या पायावर उभें राहणें देखील अशक्य करून सोडलें आहे." इतकेंच नव्हे, तर आणखी तो म्हणतो, " अशा प्रकारची जी काय थोडीशी शक्ति निसर्गतः हिंदुस्थानचे अंगीं होती, तीसुद्धां ब्रिटिश अंमलामुळें नष्ट झाली असली पाहिजे!"

सर जॉन सीली यांच्या तोंडचीं हीं स्पष्ट, कटु व भयंकर अशीं वाक्यें मी पुनःपुन्हां देत आहें; याचें कारण इतकेंच कीं, सर्वांनीं एकदिलानें गुलामगिरीचें जोखड अजिबात झुगारून देण्याचा मार्ग न स्वीकारतां इतकीं वर्षे परकी अंमलापुढें मान वांकविल्यामुळें हिंदुस्थान केवढ्या दुर्गतीला पोंचलें आहे, याची जाणीव प्रत्येक माणसाला व्हावी. इतिहासकार सर जॉन सीली हा या प्रश्नाकडे चिकित्सक व शास्त्रीय दृष्टीनें पाहत आहे. त्याला हा ऐतिहासिक सिद्धांत अत्यंत मजेदार व चित्ताकर्षक असा वाटतो. परंतु, राष्ट्रीय ऱ्हास व स्वसंरक्षणदौर्बल्य यांसंबंधीं त्यानें काढिलेल्या उद्गारांनीं मात्र आमच्या अंगाचा तिळपापड उडाला पाहिजे! सध्यांची परिस्थिति अशीच बिनबोभाट चालू राहिली, तर त्याचा परिणाम सीलीच्या म्हणण्याप्रमाणें झाल्याशिवाय राहणार नाहीं. तो म्हणतो:—
" अशीच परिस्थिति पुढें चालू राहिली, तर हिंदुस्थान प्रतिवर्षी अधि-

काधिक असहाय, अधिकाधिक स्वसंरक्षणदुर्बल, स्वावलंबनाच्या तत्त्वावर एकादें मजबूत सरकार स्थापन करण्यास अधिकाधिक असमर्थ व ब्रिटिश साम्राज्यसत्तेशिवाय इतर कोणाच्याही आधारावर जिवंत राहण्यास अधिकाधिक नालायक होत जाणार! १९०७ सालीं लाला लजपतराय यांस पकडिलें, त्याप्रसंगीं मी माझे मित्र मि. हंफ्रेज (डे. कमिशनर, दिल्ली) यांजकडे जाऊन लालाजींच्या अटकेबद्दल निषेध व्यक्त केला, व अशानें हिंदी लोक चिडल्याशिवाय राहणार नाहींत, असें त्यांस सांगितलें. त्या प्रसंगाचें चित्र अद्यापि माझे डोळ्यांसमोर उभें आहे. त्यावेळीं त्यांनीं अत्यंत प्रेमळपणानें सीलीच्या उद्गारां-प्रमाणेंच मला उत्तर दिलें. ते म्हणाले कीं, "हिंदी लोक स्वसंरक्षण-दुर्बल आहेत; आणि म्हणून प्रत्यक्ष त्यांच्या इच्छेविरुद्धही आम्हांस त्यांचें संरक्षण केलें पाहिजे. तसें आम्ही केलें नाहीं, तर लगेच पठाण, आफ्रिडी व अफगाण लोक हिंदुस्थानच्या सरहद्दीवर चाल करून येतील." हें संभाषण झाल्यावर मी केवढ्या निराशेनें घरीं परत गेलों, याची आठवण मी अद्यापि विसरलों नाहीं.

आणि खरोखर पाहतां, सर जॉन सीलीच्या हयातीनंतर, इतकेंच काय पण १९०७ सालानंतर हिंदुस्थानची कितीही प्रगति झाली असली, तरी एका बाबतींत त्याची यत्किंचितही प्रगति झालेली नाहीं. राष्ट्रीय हिंदुस्थान हें पूर्वींइतकेंच आजही स्वसंरक्षणदुर्बल आहे. आणि मला असेंहीं वाटतें कीं, कांहींकांहीं बाबतींत हिंदु-स्थानांत कितीही जागृति व प्रगति झाली असली, तरी राष्ट्रीय ऱ्हास पूर्वींइतक्याच झपाट्यानें आज चालू आहे, हें कोणाही निःपक्षपाती इतिहासकारास कबूल करावें लागेल. निदान माझी तरी अशी सम-

जूत झाली आहे कीं, लष्करी खर्चाच्या प्रचंड ओझ्यामुळें हिंदी शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस अधिकाधिक कष्टमय होत आहे. ज्या इशर कमिटीच्या रिपोर्टांतील बऱ्याचशा शिफारशींची आज अंमलबजाणी होत आहे, त्या रिपोर्टावरूनच आज हिंदुस्थानची किती दैन्यावस्था झाली आहे, तें कळून येईल. 'अठरा विश्वें दरिद्री' अशा हिंदुस्थानच्या उत्पन्नाचा जवळजवळ अर्धा भाग लष्करी खात्या-साठीं खर्च होतो, या एका गोष्टीवरून हिंदुस्थानच्या चारित्र्यांत केवढा 'डेडलॉक' उत्पन्न झाला आहे, याची सर्वत्रांस कल्पना येईल.

मी वर कबूल केलेलेंच आहे कीं, सध्यांच्या राष्ट्रीय मवाळां-प्रमाणें 'बेताच्या' व 'आस्ते कदम' प्रगतीवरच माझा कित्येक वर्षें दृढ विश्वास होता. पं. मदन मोहन मालवीय, मि. परांजपे, मि. शास्त्री मि. जिना व डॉ. सप्रू इ. विचारी व देशाभिमानी पुढाऱ्यांबद्दल मला पुष्कळच सहानुभूति वाटे; व त्यांच्या धैर्याबद्दल आणि मोठे-पणाबद्दलही मला नेहमीच आदर वाटत असे. या मंडळीचा असा ठाम विश्वास आहे कीं, इंग्लंडच्या दारीं भीक मागितल्यानें इंग्रज लोकांच्याच हस्तें हप्त्याहप्त्यांनीं व 'आस्ते कदम' हिंदुस्थानचा पुनरुद्धार होईल! परंतु आतां मात्र अनुभवाच्या ठेंचा खाल्ल्यानंतर या विचारसरणींत एक भयंकर मोठा दोष असल्याबद्दल माझी खात्री झाली आहे. आणि तो दोष हा कीं, सीलीनें वर्णिलेल्या भयंकर चक्राच्या सपाट्यांतून सुटणूक करण्यास लागणाऱ्या अंतःस्थ शक्तीचें अधिष्ठान ह्या विचारसरणींत नाहीं. राक्षसी रोग हटविण्यास राक्षसी औषधांचीच योजना केली पाहिजे; नुसतीं पोटिसें व मलमपट्ट्या बांधण्यांत काय फायदा? आमचें इंग्लंडवरील परावलंबित्व आस्ते-

कदम कमीकमी होत गेलें व सुधारणांमुळें पूर्वीं न मिळालेले असे कांहीं हक्क आम्हांस मिळाले—तरीसुद्धां या सुधारणा म्हणजे देणगी होय. ती मेहरबानगी आहे, तो राज्यकर्त्यांचा केवळ उपकार आहे. एवंच असली हक्कप्राप्ति हें शक्तीचें लक्षण नसून दुर्बलतेचें मात्र आहे. असल्या हक्कांची देणगी मिळाली तरीसुद्धां परावलंबनाची वृत्ति कायमच राहते. आणि हिंदुस्थानच्या रोगाचें सीलीनें केलेलें निदान जर खरें असेल, तर आपणांस यापुढें आणखी कालक्षेप करितां येणे शक्य नाहीं. कारण आज एका हातानें होमरूलच्या दानांचें उदक मोठ्या नाखुषीनें व कंजूषगिरीनें आमच्या हातावर सोडण्यांत येत आहे, तर दुसऱ्या हातानें आमच्या स्वातंत्र्याची गळेचेपी होत आहे; व स्वसंरक्षणदौर्बल्यामुळें बचावासाठीं इंग्लंडच्या तोंडाकडे पाहण्याची आमची भिकारडी खोड बिलकुल कमी होत नाहीं. आमचा अंतःस्थ रोग अद्यापि पूर्वींइतकाच जोरांत आहे !

अशा रीतीनें इंग्लंडनें सोडलेल्या दानाचें उदक मुकाट्यानें हातावर घेण्याच्या धोरणांत कांहींहि हांशील नाहीं, अशी माझी अनुभवानें खात्री झाली आहे. असला 'प्रगतिपथ' पत्करल्यानें खरी प्रगति होणें शक्य नाहीं. उलट त्यामुळें आपण पारतंत्र्याच्या चक्रांत गुटमळत बसूं. आणि मग त्यांतून आपली सुटका होणें शक्य होणार नाहीं. एवंच कांहीं तरी अंतःस्थ उलथापालथ झाल्याशिवाय आपण रोगमुक्त होऊन शुद्धीवर येणार नाहीं, अशी माझी अधिकाधिक खात्री पटत चालली आहे. अशा प्रकारची उलथापालथ घडवून आणणारी उत्पादक शक्ति हिंदुस्थानच्या अंतरंगांतच निर्माण झाली पाहिजे. कर्ज, देणग्या, दानें, सवलती किंवा अभिवचनें—

असल्या वरपांगी उपायांनीं ती शक्ति पैदा होणें शक्य नाहीं. तिचा उद्भव अंतरंगांतूनच झाला पाहिजे.

आणि म्हणूनच, अशा तऱ्हेच्या आत्मिक शक्तीचा प्रत्यक्ष स्फोट झालेला पाहतांना, असह्य दडपणाखालून बौद्धिक व आत्मिक शक्तींची एकदांची सुटका झाल्याकारणानें मला अतिशय आनंद झाला. म. गांधींनीं 'स्वतंत्र व्हा, गुलाम राहूं नका!' हा मंत्रोच्चार हिंदुस्थानच्या अंतरंगाशीं केला; व हिंदुस्थानानेंही त्या मंत्रोपदेशाचें सार्थक्य करून दाखविलें. एकदम हिंदुस्थानच्या पायांतील बेड्या ढिल्या पडूं लागल्या व स्वातंत्र्याचा दरवाजा खुला झाला!

---

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क्र. २२३२
संग्रह शाखा (ठाणे)

( ४ )

माझ्याविषयीं कोणाचीं मनें साशंक राहूं नयेत म्हणून माझ्या चरित्रांतील कांहीं गोष्टींचा तपशील मी येथें देण्याचें योजिलें आहे. मी हिंदुस्थानांत आल्यावर हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानाचा पगडा माझ्या मनावर बसला. आणि तेव्हांपासूनच येशू ख्रिस्ताच्या अहिंसाविषयक उद्गारांची तंतोतंत अंमलबजावणी करून प्रत्यक्ष शत्रूवरही प्रेम करणें अत्यंत इष्ट आहे, असें मला वाटूं लागलें; व हीच माझी समजूत दिवसेंदिवस अधिक दृढ होत गेली. शेवटींशेवटीं तर ही श्रद्धा बिकट प्रसंगीं कसास लावली गेली. कारण, माझ्या देशावर शत्रू चाल करून आला तर स्वसंरक्षणासाठीं तरी मी हातीं तरवार घेईन कीं नाहीं, असा माझ्यापुढें प्रश्न उभा राहिला. तेव्हां पुष्कळ दिवसांच्या आत्मसंशोधनानंतर, इंग्लंडांत प्रत्यक्ष माझ्या घरावर माझ्या शत्रूनें हल्ला केला तरीसुद्धां 'ठोंशास ठोंसा' या न्यायानें अत्याचाराचा अवलंब करून माझ्या घराचें संरक्षण करण्यास मी प्रवृत्त होतां कामा नये, असा अखेर-निर्णय मी दिला. हा मनोनिग्रह हेंच माझ्या जीविताचें सार व हाच माझा धर्म! आणि याच मनोनिग्रहामुळें, बंगाल्यांत स्वदेशी चळवळीनंतर सुरू झालेल्या सशस्त्र बंडाच्या चळवळींत देशासाठीं निर्भीडपणें आपल्या प्राणांच्या आहुति देणाऱ्या तरुणांविषयीं माझ्या मनांत अतिशय आदर वाटत होता, तरीसुद्धां ती चळवळ मला संमत नव्हती. आणि म्हणून अत्याचारी बंडामुळें हिंदुस्थानला प्रत्यक्ष स्वातंत्र्य जरी मिळत असलें तरीसुद्धां तें मला मान्य होणें शक्य नाहीं. आजपर्यंत मी या अहिंसाव्रतापासून रेंस-

भरही ढळलेला नाहीं. या बाबतींत मौलाना शौकतअली यांच्यापुढें मी आपली बाजू स्पष्टपणें मांडली असून, त्यांस माझे विचार पुरते-पणीं ठाऊक आहेत.

मी हिंदुस्थानच्या इतिहासाचें जों जों परिशीलन करून सीली-सारख्या नि:पक्षपाती इतिहासकारांनीं काढिलेले सिद्धांत वाचूं लागलों, तों तों अत्याचारी बंडाची बिलकुल जरुरी नाहीं, असें मला वाटूं लागलें. हिंदुस्थानला ब्रिटिश सैनिकांनीं जिंकिलें नाहीं; तर ब्रिटिशांच्या तंत्रानें चालणाऱ्या भाडोत्री हिंदी सैनिकांनींच हिंदुस्थान देश जिंकिला आहे ! याच्या अगदीं उलट आचरण हिंदी लोकांनीं केलें तर लष्करी अत्याचार करण्याची बिलकुल जरुरी उरणार नाहीं. हिंदी लोकांच्या मनांत फक्त बौद्धिक बंडाची प्रेरणा झाली, कीं लगेच सर्व काम आपोआपच होणार आहे. सर जॉन सीली याच्या तोंडचा उतारा मी पुन: येथें देतों. तो म्हणतो;—" हिंदुस्थानांत पुसटपुसट कां होईना, पण थोडीतरी राष्ट्रीयत्वाची भावना पैदा झाली ; व तिज-मुळें परदेशी राज्यकर्त्यांना देशांतून हांकलून देण्याची इच्छा उत्पन्न न झाली; तरी फक्त परकीयांचा राज्यकारभार चालविण्यास त्यांस मदत करणें लज्जास्पद आहे, एवढी भावना हिंदी लोकांचे मनांत पैदा होईल, तर त्या दिवसापासून आपलें साम्राज्य लयासच गेलें असें समजा ! "

दुसऱ्या एका इंग्रज गृहस्थानें (त्याचें नांव मला आठवत नाहीं ) अशाच प्रकारचे विचार पण जरा निराळ्या शब्दांत ग्रथित केले आहेत. तो म्हणतो:—" हिंदी लोकांनीं युरोपियन लोकांसाठीं

फक्त काम करण्याचें नाकारिलें, तर एका महिन्यांत गोऱ्या लोकांचें सबंध 'धवल साम्राज्य' धुळीस मिळेल!"

एवंच बहुतेक सर्व शांत व निःपक्षपाती इंग्रज इतिहासकारांचा असा अभिप्राय आहे कीं, हिंदुस्थान एकही करांगळी वर न उचलतां आपलें ध्येय साध्य करूं शकेल! नुसती लोकसंख्या विचारांत घेतली —३२ कोट हिंदी लोक तर त्यांविरुद्ध अवघे हजारांनीं मोजण्याइतके इंग्रज!—तर ती इतकी प्रचंड आहे कीं, जर हे ३२ कोट लोक नुसते एकदिलानें बोलले तर त्यांचा शद्ब व इच्छा हीं पूर्ण झालींच पाहिजेत.

अशा प्रकारें, हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्यांत प्रत्यक्ष भाग घेण्याच्या माझ्या इच्छेआड जी अडचण पूर्वींपासून येत होती, ती आपोआप नाहींशी झाली. आणि आतां आतां तर, म. गांधींच्या अहिंसा-तत्त्वासंबंधींच्या समजुती माझ्यापेक्षांही अधिक प्रौढ व तात्त्विक असल्याचें मला कळून आलें आहे. त्यामुळें त्यांचा कार्यक्रम हा अनत्याचाराच्या नांवाखालीं चालणारा अत्याचाराचा प्रकार नव्हे, हें सिद्ध होतें. त्यांच्या कार्यक्रमाचे बुडाशीं अनत्याचाराचें तत्त्व गर्भित आहे; आणि तें म. गांधींनीं शक्य तितक्या स्पष्ट शद्बांत जगापुढें मांडिलें आहे. अनत्याचार हा त्यांच्या सबंध चळवळीचा आत्मा आहे.

परंतु, बौद्धिक बंड तरी घडवून आणावयाचें कसें? हिंदी लोकांच्या विचारांत क्रांति घडून त्यांची गाडी पारतंत्र्याच्या रुळावरून स्वतंत्रतेच्या रुळावर कशी आणावयाची? साधारण लोकांच्या मनांत पूर्वापार वसत असलेली इंग्रजांविषयींची जरब कशी घालवा-

वयाची? 'परकीयांना आमच्यावर प्रभुत्व गाजविण्यास मदत करणें हें लज्जास्पद आहे' ही भावना जनतेंत कशी उत्पन्न करावयाची?—हिंदुस्थानच्या रक्तांत गुलामगिरीचें विष किती खोलवर भिनलें आहे याची जाणीव झाल्यानंतर कितीतरी वर्षें वरील प्रश्नांनीं माझ्या हृदयांत अगदीं काहूर उडवून दिलें होतें. प्रतिवर्षी मला निराशेंतही आशा वाटे कीं, हिंदुस्थानच्या बुद्धींत लौकरच क्रांति घडून येईल. परंतु, अखेर माझी निराशा झाली हें मला कबूल करणें भाग आहे. आतां आतां मात्र हीं क्रांति घडून येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

१९१७च्या ऑगष्ट महिन्यांत ब्रिटिश मंत्र्यांनीं केलेली ढोंगी-पणाची व लठ्ठलठ्ठ शद्बांनीं भरलेली घोषणा मला पूर्वीपासूनच नापसंत होती. या घोषणेमुळें संपूर्ण जबाबदार राज्यपद्धतीचा केवढा तुकडा, केव्हां हिंदुस्थानला द्यावयाचा, हें ठरविण्याचा अधिकार ब्रिटिश पार्लमेंटानें आपल्याकडे लुबाडून घेतला. त्याचप्रमाणें हिंदुस्थाननें यावच्चंद्रदिवाकरौ ब्रिटिश साम्राज्यांत एक घटक म्हणून राहिलें पाहिजे, ही भावना त्यांत अंतर्भूत असल्यामुळें या घोषणेला आणखी वैगुण्य प्राप्त झालें आहे. यासंबंधीं नागपूर कांग्रेसच्या अध्यक्षांनीं काढिलेले उद्गार यथायोग्य आहेत. ते म्हणतातः—"हिंदुस्थानवर सुलतानी हक्क गाजविण्याचा आमचा हक्क आहे, एवढेंच दाखविण्याचा हा प्रयत्न आहे." आणि म्हणूनच अशा तऱ्हेच्या राज्यपद्धतीच्या पायावर हिंदुस्थानच्या आत्मिक स्वातंत्र्याची इमारत बांधतां येणार नाहीं.

याशिवाय, साम्राज्यपरिषदेंत ऑस्ट्रियादि राष्ट्रांइतकेच हिंदु-स्थानचे सभासद घेण्याच्या बाबतींत हिंदुस्थानच्या कपाळाला ज्या

वाटाण्याच्या अक्षता लावण्यांत आल्या, त्यामुळें कोणाचीही फसवणूक होणें शक्य नव्हतें. सेव्हर्सच्या तहाच्या कच्चा मसुद्यावर इंडिया ऑफिसचे सर ऑर्थर हिर्झेल या एका गृहस्थानेंच हिंदुस्थानच्या वतीनें सही केली, या एकाच गोष्टीवरून ब्रिटिशांच्या ढोंगीपणामुळें हिंदुस्थानची किती कमी किंमत झाली आहे, याची कल्पना होईल.

तसेंच ऑस्ट्रेलियांत काळ्या लोकांस गचांडी मिळाली; दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांस निराळे 'म्हारवडे' बांधून रहावें लागलें; व सबंध ब्रिटिश साम्राज्यांत हिंदी लोकांचे बाबतींत पंक्तिप्रपंच करण्यांत आला--तरीसुद्धां सरकार याला 'प्रगति'च म्हणणार. प्रगतीच्या ह्या सरकारी सिद्धांताप्रमाणें हिंदी लोकांची इच्छा असो अगर नसो, त्यांनीं ब्रिटिश साम्राज्याचे घटक म्हणून त्यांत राहिलेंच पाहिजे, अशा प्रकारची बळजबरी त्यांचेवर करण्यांत येत आहे.

आणि म्हणूनच मोठमोठ्या जाहीर घोषणा झाल्या, कौन्सिलें सुधारलीं, साम्राज्यपरिषदा भरल्या, व इशर कमिटीचे रिपोर्ट बाहेर पडले—तरीसुद्धां माझें शंकानिरसन होऊं शकलें नाहीं. या गोष्टींनीं ग्रेटब्रिटनच्या ओंजळीनें पाणी पिण्याचा हिंदुस्थानचा दुर्गुण अमर्याद वाढल्याशिवाय राहणार नाहीं, असें मला वाटतें. इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थान कायमचें पारतंत्र्यांत पडावें म्हणूनच वरील युक्त्या जाणूनबुजून योजण्यांत आल्या असाव्या, असें मला वाटतें. तो मार्ग मागील पिढ्यांनीं तुडविला तेवढा बस्स झाला. ज्या सुधारलेल्या कौन्सिलांच्या मार्गांत जाहीर घोषणा व मोडलेलीं वचनें यांच्या रांगा लागलेल्या आहेत, त्या मार्गापासून हिंदुस्थानचा कायमचा उद्धार

कधींही व्हावयाचा नाहीं. जों जों स्वातंत्र्याची इमारत बांधीत जावें, तों तों ती उलट खचतच जाईल.

उलटपक्षीं प्रगतीचा हा संशयास्पद मार्ग सोडून देऊन, मी म. गांधींच्या अधिक जोमदार मार्गाकडे वळलों आहें. 'मूले कुठार:' या न्यायानें ते अगदीं रोगाच्या मुळांत घाव घालीत आहेत, असें मला वाटतें. ते वैद्याप्रमाणें थंड औषध देत नाहींत; तर एकाद्या शस्त्रवैद्याप्रमाणें शस्त्रक्रिया करीत आहेत. त्यांचें शस्त्र रोग्याच्या शरीरांत प्रवेश करितांच रोग्याला गुण पडलेला दिसून येईल; हिंदुस्थानचा स्वाभिमान, माणुसकी व स्वातंत्र्य या तिन्ही वृत्ति पुन: जिवंत होतील. अखेरीस सीलीचेच शद्ब खरे ठरत आहेत. 'परकीयांना त्यांच्या राज्यकारभारांत मदत करणें हें लज्जास्पद आहे' याची जाणीव आज हिंदी लोकांस होत आहे.

REFBK-0002222

दा. क्र. २२२२